शिल्पकार विकासाचा...
देशदूत
नाशिक आवृत्ती
epaper.deshdoot.com
25 May 2025 - Page 10

# देशाच्या विकासात वाघ शिक्षण संस्थेचे मोलाचे कार्य : बावनकुळे



**नाशिक । प्रतिनिधी**

१९७० साली स्थापन झालेल्या के. के. वाघ शिक्षण संस्थेचे आज वटवृक्षात रुपांतर झालेले आहे. संस्थेची जमेची बाजू म्हणजे स्थापने पासून आजवर कोणतेही वाईट आरोप नाही. गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी अग्रगण्य संस्था असा संस्थेचा महाराष्ट्रभर लौकिक आहे. संस्थेचे माजी विद्यार्थी जगभरात मानव संसाधन पुरवत आहे. देशाच्या विकासात शिक्षणाचे महत्त्व मोलाचे आहे. हेच मोलाचे काम के. के .वाघ शिक्षण संस्था करत असल्याचे महसूल मंत्री नामदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

शनिवार, दिनांक २४ मे २०२५ रोजी दुपारी ४ वाजता के के वाघ शिक्षण संस्था, नाशिक येथे आयोजित सत्कार समारंभ कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान चांदवड-देवळा मतदार संघाचे आमदार डॉ. राहुल अहेर यांनी भूषविले. या प्रसंगी नाशिक जिल्ह्यातील आमदार आमदार दिलीप बनकर, आमदार सीमा हिरे, आमदार नितीन पवार, आमदार किशोर दराडे व शैक्षणिक, सहकार, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. भूषण कर्डिले यांनी मांडले. संस्थेचे अध्यक्ष मा. समीर बाळासाहेब वाघ यांनी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, कार्यक्रमाचे अध्यक्ष व उपस्थित आमदार यांचा शाल, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देत सत्कार केला. तसेच संस्थेचे जनसंपर्क संचालक मा. अजिंक्य बाळासाहेब वाघ यांनी उपस्थित मान्यवर यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

नामदार बावनकुळे पुढे म्हणाले की, के. के. वाघ शिक्षण संस्थेने आपला विस्तार नागपूर येथे करावा...त्यास व संस्थेला भविष्यात जे काही सहकार्य लागेल त्यास सरकार म्हणून आम्ही प्रयत्नशील आहोत. नवीन शैक्षणिक धोरण व ए. आय (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) च्या साहाय्याने २०४७ सालाचा विचार करुन संस्थेने वाटचाल करावी. त्यामुळे देशाच्या विकासात भर पडेल. तसेच त्यांनी संस्थेचे माजी अध्यक्ष कै.बाळासाहेब (भाऊ) वाघ यांच्या आठवणींना उजाळा दिला.

कर्मवीर शिक्षण संस्था अशी ओळख असलेल्या संस्थेने कर्मवीर नेत्याचा अर्थात नामदार चंद्रशेखर बावनकुळे यांचा सत्कार केला असल्याची भावना कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार डॉ. राहुल आहेर यांनी केले.

कर्मवीर काकासाहेब वाघ यांचे नंतर कै. बाळासाहेब (भाऊ) वाघ यांनी सहकार व शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे काम केले, असे मनोगत आमदार दिलीप बनकर यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. व्ही. के. पाटील यांनी केले. तसेच मा. अजिंक्य बाळासाहेब वाघ आभार मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.